डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक वाचनालय पुरस्कार प्राप्त

*वाचनसंस्कृती आणि आधुनिकता यांचा संगम असलेले*

# “अजिवा”

## अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

स्थापना : १८३८

# १८१ वा वार्षिक अहवाल

## सन २०१८-१९

भावपूर्ण . . .

# श्रध्दांजली

संस्था व वाचनालयाचे आजीव सभासद,वाचक सभासद,

हितचिंतक तसेच साहित्य, समीक्षा, नाट्य, संगीत

अध्यात्म, लष्कर, देशभक्त, तत्वज्ञ, समाजकारणी

राजकारणी व ग्रंथालय चळवळ

इत्यादी क्षेत्रात भारतातील

ज्या थोर व्यक्तींनी आपल्या पराक्रमाने

भारताची शान वृध्दिंगत केली,

अशा संपन्न व समृध्द दिवंगत व्यक्तीमत्वांना

## भावपूर्ण श्रध्दांजली

अहमदनगर जिल्हा वाचनालय ( विश्वस्त संस्था )
व सावेडी वाचनालय
अहमदनगर

**२०१८ - २०१९**

रजि.नं.-पी.टी.आर.ई.-१३

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

## * विश्वस्त मंडळ *

## सन २०१६-१७ ते २०२०-२१.


| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. शिरीष मोडक | अध्यक्ष |
| २. | शिल्पा रसाळ | उपाध्यक्षा |
| ३. | श्री. अजित रेखी | उपाध्यक्ष |
| ४. | श्री. विक्रम राठोड | प्रमुख कार्यवाह |
| ५. | श्री. तन्वीर खान | खजिनदार |
| ६. | डॉ. राजा ठाकूर | सह कार्यवाह |
| ७. | श्री. अनिल लोखंडे | सदस्य |
| ८. | प्रा. मेधा काळे | सदस्या |
| ९. | श्री. राहूल तांबोळी | सदस्य |
| १०. | श्री. अनंत देसाई | सदस्य |
| ११. | श्री. दिलीप पांढरे | सदस्य |
| १२. | प्रा. सौ. ज्योती कुलकर्णी | सदस्या |
| १३. | श्री. संजय चोपडा | सदस्य |
| १४. | डॉ. शैलेंद्र पाटणकर | सदस्य |
| १५. | श्री. किरण आगरवाल | सदस्य |

निमंत्रित सदस्य :-

१.श्री. चंद्रकांत पालवे   २.श्री. गणेश अष्टेकर

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

## *कर्मचारी वृंद*

| | |
|---|---|
| श्री.अमोल इथापे (बी.ए.एम.लिब.) | - ग्रंथपाल |
| श्री.नितीन भारताल (बी.कॉम,बी.लिब.) | - सहा. ग्रंथपाल |
| कु.पल्लवी कुक्कडवाल (बी.ए.बी.लिब.) | - निर्गम सहाय्यक |
| सौ.वर्षा जोशी | - लिपिक |
| सौ.अलका घबाडे | - शिपाई |
| श्री.विठ्ठल शहापूरकर | - शिपाई |
| श्री.सिंकदर शेख | - ग्रंथालय सहाय्यक |
| कु.कुमार गोटंला | - ग्रंथालय सहाय्यक |
| कु.संकेत फाटक | - ग्रंथालय सहाय्यक |
| श्री.संजय गाडेकर | - ग्रंथालय सहाय्यक |
| सौ.उमा देशपांडे | - (सावेडी वाचनालय) प्र.ग्रंथपाल |

### अहमदनगर जिल्हा वाचनालय
### *पदसिध्द ग्रंथालय शासन समिती*

मा.श्री.सु.हि.राठोड
प्र.ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा.शिरीष मोडक<br>अध्यक्ष | श्री.विक्रम राठोड<br>प्रमुख कार्यवाह | शिल्पा रसाळ<br>उपाध्यक्षा | श्री.अजित रेखी<br>उपाध्यक्ष |
| श्री.किरण आगरवाल<br>सदस्य | श्री.तन्वीर खान<br>खजिनदार | डॉ.राजा ठाकूर<br>सहकार्यवाह | श्री.राहुल तांबोळी<br>सदस्य |
| श्री.दिलीप पांढरे<br>सदस्य | श्री.अमोल इथापे<br>ग्रंथपाल,जिल्हा वाचनालय | सौ.उमा देशपांडे<br>प्र.ग्रंथपाल, सावेडी वाचनालय | |

अहमदनगर जिल्हा वाचनालय व सावेडी वाचनालय, अहमदनगर.

*हिशोब तपासनीस*

**श्री.के.जी.सप्तर्षी ॲण्ड कंपनी, अहमदनगर.**

रजि.नं.पी.टी.आर.इ - १३ दिनांक : २८/११/२०१९.

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

सन २०१८-२०१९ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे परिपत्रक
(फक्त विश्वस्त संस्था सभासदांसाठी)

अहमदनगर जिल्हा वाचनालय विश्वस्त संस्थेची सन २०१८-२०१९ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १५/१२/२०१९ रोजी सकाळी ठिक ११ वा. जिल्हा वाचनालयाच्या लो. टिळक सभागृहात संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर विचार करण्यासाठी घेण्यात येणार आहे. तरी आपण सदर सभेस वेळेवर उपस्थित राहवे, ही विनंती.

*** विषय :-**

(१) मागील सर्वसाधारण सभा दि.१६/१२/२०१८ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(२) सन २०१८- २०१९ चा अहवाल कायम करणे.
(३) हिशोब तपासनीस श्री.के.जी.सप्तर्षी ॲण्ड कंपनी यांचे कडून तपासून आलेल्या सन २०१८-२०१९ चा जमाखर्च, ताळेबंद, पत्रकास मंजूरी देणे.
(४) विश्वस्त संस्था व वाचनालयाच्या सन २०१९ -२०२० च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
(५) सन २०१९ - २०२० सालासाठी हिशोब तपासनीसांची नेमणूक करणे.
(६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

आपला,
**विक्रम राठोड,**
प्रमुख कार्यवाह,
अहमदनगर जिल्हा वाचनालय, (विश्वस्त संस्था )

---

**टिप** : १. सभेचे कामकाज संस्थेच्या घटनेतील नियमानुसार होईल.
२. सभेस आवश्यक गणपूर्ती न झाल्यास नियमांनुसार अर्ध्या तासानंतर सभेचे कामकाज सुरु करण्यात येईल.यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
३. ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी लेखी प्रश्न दि. १४/१२/२०१९ रोजी सायं. ७ वाजेपर्यंत वाचनालयाचे ऑफिसमध्ये आणून द्यावेत. आयत्या वेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सूचना** - १. सन २०१८- २०१९ चा वार्षिक अहवाल व सन २०१८-१९ च्या जमा खर्चाची व उत्पन्न खर्चाची पत्रके वाचनालयाच्या www.ajivalibrary.org या वेबसाईट वर उपलब्ध आहेत. कृपया नोंद घ्यावी.
२. आपण आपला ई-मेल व मोबाईल नंबर पूर्ण पत्त्यासह वाचनालयात कळवावा.

## अध्यक्षीय निवेदन

**सन्मानीय बंधू भगिनीनो......**

**अहमदनगर जिल्हा वाचनालय व विश्वस्त संस्थेचा सन २०१८-२०१९ चा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना मला आनंद होत आहे.**

या वाचनालयाची स्थापना १८३८ मध्ये पी.टी.फ्रेंच यांनी केली. तेव्हापासून आज पर्यंत अहमदनगर जिल्हा वाचनालय सातत्याने अखंडितपणाने सुरु आहे. हे या वाचनालयाचे वैशिष्ट्य होय.महाराष्ट्रात सर्वात जुन्या असलेल्या या वाचनालयात आज १ लाख १० हजार पुस्तके आहेत. तसेच ३ हजार ३०० वाचक सभासद वाचनाचा लाभ घेत आहेत. दरवर्षी दिवाळीत ५०० ते ६०० दिवाळी अंकाची साहित्यिक मेजवानी वाचक सभासदांसाठी उपलब्ध करून दिली जाते. मराठी बरोबरच हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथसंपदा वाचनालयात आहे. तसेच अंधासाठी ब्रेल लिपीतील पुस्तकेही आहेत. या वर्षी नव्याने डॉ. शंकरराव आडकर हिंदी कक्ष स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आला आहे. बालवाचकांसाठी स्वतंत्र विभाग असून दर वर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत बालवाचकांकरिता एप्रिल ते जून या कालावधीत वाचनासाठी मोफत सभासदत्व दिले जाते. दरवर्षी वसंत व्याखानमाला आयोजित केली जाते. वाचन वृद्धीसाठी प्रोत्साहन देत असताना लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट साहित्य कृतीस पुरस्कार देणे सुरु असून गेल्या तीन वर्षापासून कै. पद्माकर डावरे स्मृति विनोदी मराठी लघुकथा लेखन स्पर्धा श्री. रविंद्र डावरे यांचे सहकार्याने राज्यस्तरीय विनोदी मराठी लघुकथा लेखन स्पर्धा घेण्यात येत आहे. यास चांगला प्रतिसाद लाभला विजयी स्पर्धकांना समारंभ पूर्वक पारितोषिके प्रदान करण्यात आली. त्याच बरोबर वाचनालयाच्या वतीने भारताचे मा.राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन, मराठी राज्यभाषा दिन, (२७ फेब्रु) जागतिक पुस्तक दिन (२३ एप्रिल), वसंत व्याखानमाला, शालेय स्फुर्तीगीत गायन स्पर्धा व शालेय चित्रकला स्पर्धा, व्यक्तिमत्व विकास शिबीराचे दरवर्षी सातत्याने यशस्वी आयोजन करण्यात येते.

नव्या युगा नुसार १८१ वर्षांची दैदिप्यमान वाचन परंपरा असलेले अहमदनगर जिल्हा वाचनालय ही कात टाकते आहे. परंपरा व नवता यांचा संगम साधत वाचनालयामध्ये ई-लायब्ररीचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून वाचनालयातील ग्रंथ संपदेच्या बारकोर्डीगचे काम अतिंम टप्प्यात आहे. तसेच वाचकाला आपल्या आवडीचे पुस्तक कमीत कमी कालावधीत उपलब्ध व्हावे या हेतूने LIBRARY KIOSK प्रणालीचे उद्‌घाटन या वर्षी करण्यात आले. याचा वाचक सभासद लाभ घेत आहेत. मुक्तव्दार विभागात दररोज विविध २२ वृत्तपत्रे वाचकांना मोफत वाचनासाठी उपलब्ध करून दिली जातात.

पुस्तकांची संख्या वाढत चालली आहे. त्यांचे जतन करणे तसेच दुर्मिळ पुस्तकांचे डिजिटलायझेशन करण्याचे कामे करायचे आहे. माझी खात्री आहे की नजिकच्या भविष्य काळात हे कार्य प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड व सन्मानीय संचालक मंडळ यांच्या सहकार्यातून निश्चित पूर्ण होईल.

वाचनालयात उत्तमोत्तम ग्रंथ असावेत व वाचकांना त्याचा लाभ घडावा यासाठी महाराष्ट्र शासनाचे अनुदान दरवर्षी वाचनालयास प्राप्त होत आहे. यंदा ही रु.७,२०,०००/- इतके प्राप्त झाले

त्यातून अभिजात वाड्मयपर ग्रंथ व शासनाने निर्देशित केलेले असे एकूण रु.१,८२,०८२/- किंमतीच्या पुस्तकांची खरेदी केली. तसेच अहवाल वर्षात रु.१,४४,०२८/- चे वाचन साहित्य म्हणजेच वर्तमानपत्रे व नियतकालिके, दिवाळी अंक वाचकांना उपलब्ध करून देण्यात आली.

सावेडी वाचनालयासाठी अद्ययावत अशी चांगली जागा मिळवण्याचा प्रयत्न सातत्याने आम्ही करत आहोत. त्यास लवकरच यश येईल असे वाटते. सध्या सावेडी वाचनालयात ७,७५५ इतकी पुस्तके आहेत. तसेच १०० च्या वर दिवाळी अंक उपलब्ध करून दिले आहेत.

या वर्षी आमचे सहकारी व वाचनालयाचे सह कार्यवाह उदय काळे यांचे निधन झाले. वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यात त्यांचे मोलाचे सहकार्य होते. त्यांच्या निधनामुळे मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

मा.प्र.ग्रंथालय संचालक श्री. सु. हि. राठोड साहेब, मुंबई, मा. प्र. सहाय्यक ग्रंथालय संचालक सौ. कविता महाजन, नाशिक तसेच अ.नगर जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री. अशोक गाडेकर साहेब, निरीक्षक संपत वाकचौरे व त्यांचे सहकारी तसेच आर.आर.आर.फौंडेशनचे क्षेत्रीय अधिकारी श्री. अनंत वाघ यांचे वाचनालयास वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले व लाभत आहे. वाचनालयाचे हिशोब तपासनीस मा. के.जी.सप्तर्षी आणि कंपनी यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल मनापासून आभार. प्रमुख कार्यवाह श्री. विक्रम राठोड, उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष श्री. अजित रेखी खजिनदार श्री. तन्वीर खान, सह कार्यवाह डॉ.राजा ठाकूर या पदाधिकाऱ्याच्या कार्यकौशल्याने वाचनालय प्रगती करीत आहे. याच बरोबर श्री. राहुल तांबोळी, प्रा.ज्योती कुलकर्णी, श्री. किरण आगरवाल, श्री. दिलीप पांढरे श्री. अनंत देसाई, श्री. अनिल लोखंडे, श्री. संजय चोपडा, प्रा. मेधा काळे, डॉ. शैलेंद्र पाटणकर त्याचप्रमाणे समिती सदस्य श्री. चंद्रकांत पालवे, श्री. गणेश अष्टेकर अशा उत्साही सदस्यांच्या परिश्रमाने वाचनालयात राबविण्यात आलेले सर्वच उपक्रम जोमाने व उत्साहात पार पडले. या सर्वांचे अभिनंदन व आभार. मा. ग्रंथपाल श्री. संजय लिहिणे, ग्रंथपाल श्री. अमोल इथापे, सहा. ग्रंथपाल श्री. नितीन भारताल, कु. पल्लवी कुक्कडवाल, सौ. अलका घबाडे, सावेडी वाचनालयाच्या सौ. उमा देशपांडे व सर्व कर्मचारी यांच्या मेहनतीने अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. हे सर्व करीत असताना वाचनालयाच्या कार्याला आपल्या लोकप्रिय दैनिकातून योग्य ती प्रसिद्धी देण्याचे मौलिक काम केलेल्या वृत्तपत्राचे संपादक, पत्रकार बंधू, केबल चालक यांचे आभार मानणे अगत्याचे आहे. तसेच वाचक सभासद, आजीव सभासद, देणगीदारं, हितचिंतक यांच्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार व धन्यवाद !

**प्रा. शिरीष मोडक,**
**अध्यक्ष,**
**अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था),**
**अहमदनगर.**

# सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम २०१८-२०१९

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात वाचनालयाच्या वतीने विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम हिरीरीने राबविण्यात आले. समाजमनात वाचनालयाची प्रतिमा उंचावण्यासाठी सामाजिक बांधिलकीतून सर्व नागरिकांसाठी राष्ट्रीय सण, सत्कार, मान्यवरांची जयंती, पुण्यतिथी, व्यक्तिमत्व विकास शिबीर, उद्घाटन, विविध स्पर्धा असे उप्रकम वर्षभर राबविण्यात आले या सर्व उपक्रमांना प्रतिसाद लाभला.

## *सन २०१८-१९ जयंती, पुण्यतिथी संपन्न :-

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने मान्यवर थोर महापुरुषांची व थोर महिलांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी त्या त्या थोर व्यक्तीना नम्र अभिवादन करून त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

**(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती :**
शनिवार, १४ एप्रिल,२०१८

**(२) लोकमान्य टिळक व अण्णाभाऊसाठे जयंती :**
बुधवार, ०१ ऑगस्ट,२०१८

**(३) राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती :**
मंगळवार, ०२ ऑक्टोबर,२०१८

**(४) पंडीत जवाहरलाल नेहरू जयंती-बालदिन :**
बुधवार,१४ नोव्हेंबर,२०१८

**(५) महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी :**
बुधवार,२८ नोव्हेंबर,२०१८

**(६) भारत डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन :**
गुरुवार,६ डिसेंबर,२०१८

**(७) सावित्रीबाई फुले जयंती-महिला मुक्तिदिन :**
गुरुवार,०३ जानेवारी,२०१९

**(८) नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती :**
बुधवार,२३ जानेवारी,२०१९

**(९) महात्मा गांधी पुण्यतिथी :**
बुधवार,३० जानेवारी,२०१९

**(१०) छत्रपती शिवाजी महाराज जयंती :**

मंगळवार,१९ फेब्रुवारी,२०१९

**(११) स्वा.सावरकर स्मृतिदिन :**

मंगळवार,२६ फेब्रुवारी,२०१९

## * राष्ट्रीय सण समारंभ व ध्वजवंदन :-

**मंगळवार दि. १ मे, २०१८ - महाराष्ट्र दिन - कामगार दिन**

**बुधवार दि. १५ ऑगस्ट, २०१८ - भारतीय स्वातंत्र्य दिन**

**शनिवार दि. २६ जानेवारी २०१९ - भारतीय गणराज्य दिन**

दरवर्षी प्रमाणे अहवाल वर्षात वाचनालयात वरील राष्ट्रीय महत्वाचे समारंभ उत्साहात व थाटात साजरे करण्यात आले. या समारंभास अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह श्री. विक्रम राठोड, उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, सहकार्यवाह श्री. उदय काळे, संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, संचालक किरण आगरवाल, दिलीप पांढरे, डॉ. राजा ठाकूर, श्री. अनंत देसाई,श्री. राहूल तांबोळी, श्री.चंद्रकांत पालवे, श्री. गणेश अष्टेकर ग्रंथपाल. संजय लिहिणे, सहा. ग्रंथपाल. अमोल इथापे, लिपिक नितीन भारताल व सर्व कर्मचारी वर्ग तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

**व्यक्तिमत्व विकास वर्ग - शुभारंभ २१ एप्रिल ते २७ एप्रिल २०१८ :**

अहवाल वर्षात वाचनालयाचे वतीने १८ एप्रिल ते २५ एप्रिल २०१८ या कालावधीत लहान शालेय मुलांमुलींसाठी व्यक्तिमत्व विकास वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर दोन दशकापासून सातत्याने घेतले जाते. या शिबिरास उत्तम प्रतिसाद लाभला. वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांना रोज वेगवेगळ्या तज्ञांचे मार्गदर्शन लाभले. श्री. शिवाजी नाईकवाडी, सौ. सुप्रिया मैड, सौ. स्मिता म्याना, सौ, उमा देशपांडे, यांनी मुलांना मार्गदर्शन केले. प्रा.ज्योती कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली श्लोक,व्यायाम,गोष्टी,काव्य,चित्रकला, हस्तकला, खेळ, अभिनय,पाठांतर,वक्तृत्व अशा अनेक विषयांवर प्रशिक्षण दिले. या शिबिरात मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शिबीराचे उद्घाटन वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक हस्ते झाले. प्रमुख कार्यवाह श्री. विक्रम राठोड यांनी शिबिरार्थीचे स्वागत केले. सह कार्यवाह उदय काळे यांनी संस्थेचा परिचय करून दिला या प्रसंगी गणेश अष्टेकर यांनी आभार मानले. २७ एप्रिल रोजी सदर शिबिराचा समारोप नाट्यदिग्दर्शक श्री. देवाशिष शेडगे यांच्या उपस्थितीत पार पडला. या वेळी शिबिरार्थीना पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक व खाऊ वाटप करण्यात आला. या वेळी प्रा. शिरीष मोडक यांनी आपले मौलिक विचार मांडले व वाचनालयाच्या वतीने ३ महिने मोफत बालवाचक या उपक्रमाची घोषणा केली. या वेळी उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, सह कार्यवाह उदय काळे, तन्वीर खान ,प्रा.ज्योती कुलकर्णी, किरण आगरवाल, दिलीप पांढरे, अनिल लोखंडे,

संजय चोपडा, गणेश अष्टेकर, कवी चंद्रकांत पालवे,ग्रंथपाल संजय लिहिणे, व कर्मचारी पालक वर्ग उपस्थित होते.

*** २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिन साजरा: सोमवार २३ एप्रिल, २०१८**

वाचनालयातील लोकमान्य टिळक सभागृह येथे व्यक्तिमत्व शिबिरातील विद्यार्थ्यांबरोबर पुस्तक दिन साजरा करण्यात आला. प्रा.शिरीष मोडक यांनी सर्वात प्रथम लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास हार अर्पण करून शेक्सपिअर यांच्या प्रतिमेस हार अर्पण केला. शेक्सपिअर बद्दल मुलांना माहिती सांगितली. पुस्तकांचे महत्व विशद केले. या प्रसंगी उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, सहकार्यवाह उदय काळे, संचालक राहूल तांबोळी, किरण आगरवाल, प्रा.ज्योती कुलकर्णी, कर्मचारी,पालक उपस्थित होते.

*** १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिना निमित्त हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण :**

१ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून वाचनालयात हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमा प्रसंगी सह.कार्यवाह उदय काळे अध्यक्ष स्थानी होते. त्यांनी या प्रसंगी आपले मौलिक विचार मांडले. या कार्यक्रमाला सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग, ग्रंथपाल व वाचक उपस्थित होते.

*** वसंत व्याख्यानमाला शुभारंभ मंगळवार १५ मे, २०१८ :**

**वक्ते :श्री.लक्ष्मीकांत देशमुख,** विषय- २१ व्या शतकातील स्त्री - पुरुष तुलना

दर वर्षीप्रमाणे वाचनालयाच्या वतीने १५ मे २०१८ ते १९ मे २०१८ असे ५ दिवस सलग विविध विषयांवरील नामवंत व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. व्याख्यानमालेचे उद्घाटन माजी. आमदार व शिवसेनेचे उपनेते मा. श्री. अनिलभैय्या राठोड यांच्या हस्ते झाले. नाशिक विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक आ.अ.ढोक, मा. श्री. व्याख्याते मा .श्री. लक्ष्मीकांत देशमुख (पुणे), यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.शिरीष मोडक यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांनी करून दिला. संचालक मंडळ, वाचक, सभासद, कर्मचारी वर्ग व श्रोते उपस्थित होते.

*** वसंत व्याख्यानमाला पुष्प २ रे बुधवार १६ मे, २०१८ :**

**वक्ते : मा. श्री अनंत जोशी,** विषय- छत्रपती शिवरायांची युद्धनीती-

सातारा येथील श्री. अनंत जोशी यांनी सेनापती व सैनिकांचे शोर्य छत्रपती शिवाजी महाराजांकडे होते. विजयाकडून विजयाकडे ही छत्रपती शिवाजी महाराजांची रणनीती होती. म्हणून अलेक्झांडर नेपोलियन यांच्यापेक्षा शिवाजी महाराजांचे युद्धतंत्र व युद्धनीती सरस होती. आपली संपर्क

रेषा कायम अबाधित ठेवणारा राजा म्हणजे शिवाजी महाराजा होय. शहिस्तेखानाची बोट छाटणे, अफजल खानाचा वध हे त्या काळचे सर्जिकल स्ट्राइक होते. वक्ते. श्री. अनंत जोशी यांनी योग्य प्रकारे विषय मांडून तरूण प्रेक्षकांची व श्रोत्यांची मने जिंकली. या प्रसंगी वाचनालयाचे सर्व मान्यवर व मोठ्या प्रमाणावर श्रोते उपस्थित होते.

*** वसंत व्याख्यानमाला पुष्प ३ रे गुरुवार १७ मे, २०१८ :**

**वक्ते : मा. श्री. रवींद्र गुर्जर** विषय- बदलता साहित्य प्रवास

पूर्वी केवळ लेखणीचा उपयोग करून लिहिले जात होते. मात्र बदलत्या काळात तंत्रज्ञानाचा वापर लेखनासाठी केला जात असल्याने फेसबुक, व्हॉटसअप, ब्लॉगच्या माध्यमातून लेखन केले जात असल्याने ते सर्व दूर पोहचले आहे असे प्रतिपादन रवींद्र गुर्जर यांनी केले. प्रास्ताविक अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, स्वागत प्रमुख.कार्यवाह विक्रम राठोड यांनी केले, संचालक दिलीप पांढरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा.ज्योती कुलकर्णी यांनी केले. उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांनी आभार मानले.यावेळी संचालक मंडळ, वाचक, श्रोते उपस्थित होते.

*** वसंत व्याख्यानमाला पुष्प ४ थे शुक्रवार १८ मे, २०१८ :**

**वक्ते : मा.सुलभाताई तेरणीकर.** विषय- माझ्या चंदेरी आठवणी

माझ्या चंदेरी आठवणी यावर वसंत व्याख्यानमालेचे ४ पुष्प सुलभाताई तेरणीकर यांनी गुफंले कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. शिरीष मोडक यांनी केले. पाहुण्याचा परिचय प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी करून दिला उपस्थितांचे आभार सह कार्यवाह उदय काळे यांनी मानले. तसेच सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. संगीताच्या व चित्रपटाच्या क्षेत्रातील विविध अभिनेत्यांच्या व संगीतकारां विषयीच्या आठवणी व अनुभव रसिकांना चंदेरी दुनियेची सफर घडली. जेष्ठ पत्रकार व वाचनालयाच्या उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांनी सुलभाताईशी मुक्त सवांद साधला.

***वसंत व्याख्यानमाला पुष्प ५ वे शनिवार १९ मे, २०१८ :**

**वक्ते : ॲड. असीम सरोदे** .विषय- लोकशाही आणि न्याय व्यवस्थेचा गळा घोटला जात आहे का ?

पाहुण्याच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. शिरीष मोडक यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी केले. सह कार्यवाह उदय काळे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन श्री. दिलीप पांढरे यांनी केले. उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष श्री,अजित रेखी, खजिनदार तन्वीर खान, श्री. किरण आगरवाल श्री. अनिल लोखंडे, श्री. राहूल तांबोळी, श्री. अनंत देसाई, श्री. गणेश अष्टेकर, श्री. चंद्रकांत पालवे. ग्रंथपाल.श्री.

संजय लिहिणे, सहायक ग्रंथपाल अमोल इथापे व कर्मचारी वर्ग व वाचक सभासद,श्रोते उपस्थित होते.

*** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी**

**बुधवार ०१ ऑगस्ट, २०१८ :**

अहवाल वर्षात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त वाचनालयाच्या वतीने निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती ही स्पर्धा शालेय गट व खुला गट अशा दोन गटांत झाली. प्रारंभी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास प्रा. शिरीष मोडक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी प्रमुख मान्यवरांचे भाषण झाले त्यांनी लो.टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील घटनांना उजाळा दिला या कार्यक्रमा प्रसंगी सर्व कार्यकारी मंडळ व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***अहमदनगर जिल्हा वाचनालय अयोजित शालेय चित्रकला स्पर्धा रविवार ५ ऑगस्ट, २०१८**

दरवर्षी प्रमाणे अहवाल वर्षात अ.जि.वा. वतीने शालेय चित्रकला स्पर्धा भरविण्यात आली होती. ही स्पर्धा २ री व ३ री व गट ४ थी व ५ वी या दोन गटात घेण्यात आली. यात शहरातील जास्तीत जास्त शाळांमधील विद्‌यार्थी सहभागी झाले होते. या वेळी उद्‌घाटन प्रा. शिरीष मोडक यांच्या हस्ते झाले. उपस्थित प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, खजिनदार तन्वीर खान, सह कार्यवाह उदय काळे, संयोजक किरण आगरवाल, संचालक दिलीप पाढरे, प्रा.ज्योती कुलकर्णी, राहूल तांबोळी, डॉ. राजा ठाकूर, अनिल लोखंडे, संजय चोपडा, अनंत देसाई, डॉ. शैलेंद्र पाटणकर, कवी चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल संजय लिहिणे, जीडी आर्ट्सचे शिक्षक वर्ग, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***चित्रकला व निबंध स्पर्धेचा परितोषिक वितरण समारंभ,मंगळवार १४ ऑगस्ट २०१८**

अजिवा च्या वतीने घेण्यात आलेल्या लो.टिळकांच्या जीवनावरील निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम लो.टिळक सभागृहात थाटात व उत्साहात पार पडला. सोशल मीडियामुळे सध्याची पिढी स्वतःच्या विचार व कृती यापासून दूर होत चालली आहे. कल्पनाशक्ती व संवेदना बोथट होत असतांना देशाला सुराज्याकडे घेऊन जाणारी पिढी वाचन, खेळ, कला या पासून दूर झाली आहे. अशा स्थितीत नगर जिल्हा वाचनालय सातत्याने स्पर्धेच्या माध्यमातून लेखन व कलेला दिलेले प्रोत्साहन व त्यातून येणारा विचार स्वतःला व पर्यायाने समाजाला प्रगतीकडे घेऊन जाणारा असल्याचे प्रतिपादन लेखक प्रा. एन.बी.मिसाळ यांनी

केले. जिल्हा वाचनालयाने लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त आयोजित निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा.शिरीष मोडक, कार्यवाह विक्रम राठोड, उपाध्यक्ष अजित रेखी, सह कार्यवाह उदय काळे, संचालक किरण आगरवाल, प्रा.ज्योती कुलकर्णी, राहुल तांबोळी, दिलीप पांढरे, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल संजय लिहिणे,परिक्षक व चित्रकार अशोक डोळसे, आर. बी. कुलकर्णी, प्रा. विनायक पवळे उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. मोडक यांनी स्पर्धेविषयी भूमिका विषद केली. सूत्रसंचालन प्रा. ज्योती कुलकर्णी, निकाल वाचन गणेश अष्टेकर यांनी केले. उदय काळे यांनी आभार मानले.

स्पर्धेचा निकाल :- निबंध स्पर्धेतील लहान गटात प्रथम क्रमांक- साक्षी नवले, व्दितीय क्रमांक- प्राची पांडुळे, तृतीय क्रमांक- उजमा तांबोळी. खुला गट, प्रथम क्रमांक - वैभव वाघ, व्दितीय क्रमांक- अक्षदा वडणीकर, तृतीय क्रमांक- प्रेषिका पाठक, चित्रकला स्पर्धेत पहिल्या गटात :- (इयत्ता २ री ते ३ री ) प्रथम क्रमांक :- प्राजक्ता सैदाणे, व्दितीय क्रमांक - सताक्षी लोणकर, तृतीय क्रमांक- अव्दित गहाणडुले.

***१५ ऑगस्ट २०१८ स्वातंत्र्य दिन ध्वजारोहण, बुधवार १५ ऑगस्ट,२०१८ :**

१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिना निमित्त वाचनालया मध्ये ध्वजारोहण आयोजित करण्यात आले होते. उपाध्यक्ष अजित रेखी यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. या वेळी उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, सह कार्यवाह उदय काळे, किरण आगरवाल, डॉ.राजा ठाकूर, राहुल तांबोळी, प्रा. ज्योती कुलकर्णी, व ग्रंथपाल संजय लिहिणे व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

***अजिवा आयोजित कै.पद्माकर डावरे स्मृति विनोदी लघुकथा लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ :- शनिवार १८ ऑगस्ट २०१८**

चांगला तत्वज्ञ हा चांगला वाचक असतो. वाचनालयांच्या रॅकमधील पुस्तकांच्या अवस्थेवरून ती किती हाताळली जातात हे समजते. या पुस्तकांना एक प्रकारचा सुगंध येतो, असे प्रतिपादन मॅब एव्हिएशन या कंपनीचे संचालक व मुंबई येथील प्रसिध्द उद्योजक मंदार भारदे यांनी केले. अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयाने कै. पद्माकर डावरे स्मृति प्रित्यर्थ राज्यस्तरीय मराठी विनोदी लघुकथा लेखन स्पर्धा आयोजित केली होती. त्याचे पारितोषिक वितरण उद्योजक मंदार भारदे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, सह कार्यवाह उदय काळे, संचालक किरण आगरवाल, दिलीप पांढरे ,प्रा. ज्योती कुलकर्णी, राहुल तांबोळी, निमंत्रित सदस्य चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर, प्रमुख पाहुण्या ॲड. पूजा गुंदेचा उपस्थित होत्या. नगरमधील उद्योजक रवींद्र डावरे यांनी वाचनालयाकडे २५ हजार रुपये ठेव ठेवली आहे. त्यातून या स्पर्धा घेतल्या जातात. यावेळी भारदे यांनी जिल्हाधिकारी आणि माकड ही कथा सांगून उपस्थितांना

हसविले. यात सरकारी कार्यालयाच्या कारभारावर त्यांनी भाष्य केले.प्रास्तविक प्रा.शिरीष मोडक यांनी केले. उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या प्रसंगी परीक्षक प्रा. डॉ. च. वि. जोशी व प्रा. मेधाताई काळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंदार भारदे यांच्या हस्ते वाचक सभासद यांना पुस्तके शोधण्यासाठी वाचनालयाच्या की-ओसचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक रवींद्र डावरे, सुरेखा डावरे, चित्रकार वसंतराव विटणकर, हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ब्रिजलाल सारडा, संचालक डॉ. पारस कोठारी, अजित बोरा उपस्थित होते. मराठी विनोदी लघुकथा लेखन स्पर्धेत द .श .मोहोळकर (सोलापूर) यांनी प्रथम क्रमांक (३ हजार शंभर रुपये व ट्रॉफी ) पटकाविला. व्दितीय- डॉ. श्यामसुंदर झळके (सिन्नर,नाशिक) (२ हजार शंभर रुपये व ट्रॉफी) तृतीय- सतीश कुलकर्णी (१ हजार पाचशे व ट्रॉफी) उत्तेजानर्थ - आकाश काळे (औरंगाबाद) (५०० रुपये ) व रामकृष्ण अघोर (सोलापूर) (५०० रुपये )यांना मिळाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथपाल संजय लिहिणे, सहा. ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल ओकांर बडगू, विठ्ठल शहापूरकर यांनी परिश्रम घेतले.

### *श्री गणेश चतुर्थी, गुरुवार १३ सप्टेंबर, २०१८ :

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयात श्री गणेश मूर्तीची स्थापना श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी करण्यात आली. अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांच्या हस्ते श्री मूर्तीची स्थापना करून पूजा करण्यात आली. संचालक किरण आगरवाल यांनी आकर्षक सजावट केली. प्रा.ज्योती कुलकर्णी व प्रा. आर. जी. कुलकर्णी या दामपत्याच्या हस्ते सत्यनारायण पूजा करण्यात आली. या प्रसंगी उपाध्यक्ष श्री. अजित रेखी, श्री.दिलीप पांढरे, श्री. अनिल लोखंडे सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद व वाचक उपस्थित होते.

### *श्री गणेश विसर्जन,रविवार २३ सप्टेंबर, २०१८ :-

श्री पार्थिव गणपती विसर्जन, श्री गणेश पूजन, उत्तरपूजा, महाआरती, संचालक किरण आगरवाल, गणेश अष्टेकर, दिलीप पांढरे, अनिल लोखंडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली व गणपती विसर्जन सीना नदी येथे करण्यात आले. या वेळी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

### *महात्मा गांधी जयंती,लालबहादूर शास्त्री जयंती मंगळवार २ ऑक्टोबर २०१८:-

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयात महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमा प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळेस वाचनालयाचे संचालक किरण आगरवाल दिलीप पांढरे, गणेश अष्टेकर, चंद्रकांत पालवे व सभासद, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***वाचन प्रेरणा दिन, सोमवार १५ ऑक्टोबर, २०१८ :**

जागतिक किर्तीचे शास्त्रज्ञ व भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी वाचनालयाचे वतीने व राज्य मराठी विकास संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिनी वाचनध्यास हा उपक्रम साजरा करण्यात आला. अहमदनगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने व शासनाच्या राज्य मराठी विकास संस्था मुंबई या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुलांमध्ये शालेय वयापासून वाचनाची आवड निर्माण करणे गरजेचे असल्याचे सांगितले. या प्रसंगी अहमदनगर महिला मंडळाच्या अध्यक्षा प्रा. ज्योती केसकर वाचनालयाच्या उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, कार्यवाह विक्रम राठोड, संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, संचालक राहूल तांबोळी, दिलीप पांढरे, किरण आगरवाल, गणेश अष्टेकर, कवी चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल संजय लिहिणे व मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम दोन सत्रा मध्ये पार पडला. सकाळच्या सत्रामध्ये प्रा. शिरीष मोडक यांच्या हस्ते लोकमान्य टिळक व डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच सरस्वती पूजन ही करण्यात आले. प्रा.शिरीष मोडक यांनी डॉ. कलाम यांच्या कार्याबद्दल, कर्तृत्वा संबधी माहिती सांगितली. या प्रसंगी सर्वांनी डॉ. कलाम यांना श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमाला सर्व वाचक कर्मचारी व कार्यकारी मंडळ उपस्थित होते. दुपारच्या सत्रामध्ये लोकसाहित्याचे अभ्यासक व जेष्ठ साहित्यक प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना साधनांच्या वाढत्या गर्दीत समाजघटकाला वाचनालया पर्यंत घेऊन येणे, वाचकांमध्ये वाचनाची आवड व अभिरुची विकसीत करणे हे वाचनालयासमोरील मोठे आव्हान असल्याचे प्रतिपादन केले. अ.नगर जिल्हा वाचनालय आयोजित वाचन प्रेरणा दिना निमित्त लेखक- वाचक परिसंवादात प्राचार्य बोलत होते. उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, संचालिका, प्रा. ज्योती कुलकर्णी,राहूल तांबोळी, दिलीप पांढरे, किरण आगरवाल, निमंत्रित सदस्य कवी चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर ग्रंथपाल संजय लिहिणे व कर्मचारी, वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

***दिवाळी अंकाचे वितरण, सोमवार ५ नोव्हेंबर, २०१८ :**

दिवाळीमध्ये वाचनालयाच्या वाचकांसाठी दिवाळी अंक वितरण चा शुभारंभ ०५ नोव्हेंबर २०१८ रोजी उद्योजक महेश देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक व कार्यवाह विक्रम राठोड यांनी वाचनालय करत असलेल्या समाजउपयोगी कामाची माहिती उपस्थितांना दिली. वाचनालयास ज्या व्यक्ती संस्था सहकार्य करीत आहेत त्यांचे कौतुक या वेळी करण्यात आले. या समारंभास उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, संचालक किरण आगरवाल,राहूल तांबोळी, दिलीप पांढरे, प्रा. ज्योती कुलकर्णी, कवी चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर,

उद्योजक नंदू आढाव, सागर शर्मा, अशोक दाणी, सुरेश मैड, प्रसाद तांदूळवाडकर, ग्रंथपाल संजय लिहिणे, अनेक वाचक कर्मचारी वृंद कार्यकारी मंडळ उपस्थित होते.

## *राष्ट्रीय स्फूर्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन, शुक्रवार २५ जानेवारी, २०१९ :

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त २५ जानेवारी रोजी वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात राष्ट्रीय स्फूर्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन गटात या स्पर्धा संपन्न झाल्या नंतर लगेच पारितोषिक वितरण समारंभ झाला. या वेळी प्रमुख पाहूणे संगीततज्ञ लक्ष्मणराव डहाळे उपस्थित होते. प्रथम लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येऊन कार्यक्रमास सुरुवात झाली. स्फूर्तिगीत गायन स्पर्धेतून उगवत्या पिढीत देशप्रेमाचे स्फुलिंग पेटवा असे आवाहान पालक शिक्षकांना श्री. डहाळे यांनी केले. या स्पर्धेत ३२ संघानी भाग घेतला होता. दोन गटात स्पर्धा झाली. स्पर्धेनंतर विजयी स्पर्धकाना पारितोषिक प्रदान करण्यात आली. या प्रसंगी अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, सह कार्यवाह उदय काळे, संचालक किरण आगरवाल, राहूल तांबोळी, दिलीप पांढरे, गणेश अष्टेकर परीक्षक प्रकाश शिंदे, सौ. वर्षा पंडीत, ग्रंथपाल श्री. संजय लिहिणे व शालेय विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी केले. निकाल वाचन गणेश अष्टेकर यांनी केले. आभार उदय काळे यांनी मानले. स्पर्धेचा यशस्वीतेसाठी कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे - (लहान गट ) प्रथम क्रमांक- मराठी शाळा विश्रामबाग व्दितीय- समर्थ विद्या मंदिर, सावेडी, तृतीय- बाई इचरजबाई फिरोदिया, उत्तेजानर्थ- आर्मी पब्लिक स्कूल, बालक मंदिर महिला मंडळ, जि.प.शाळा सारोळाबद्दी, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लीश मेडियम स्कुल, (विशेष पारितोषिक) लिटील फ्लॉवर नर्सरी स्कुल. (मोठा गट) - प्रथम भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, व्दितीय- ज्ञानसंपदा इंग्लीश मेडियम स्कुल, तृतीय- नवीन मराठी शाळा, उत्तेजानर्थ - आर्मी पब्लिक स्कुल, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लीश मेडियम स्कुल, सविता रमेश फिरोदिया स्कुल, रेसिडेन्शीयल हायस्कूल (विशेष प्राविण्य). स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सहा. ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल, सौ. अलका घबाडे, ओंकार बडगु, विठ्ठल शहापुरकर यांचे सहकार्य लाभले.

## *गणराज्य दिन साजरा, शनिवार २६ जानेवारी, २०१९ :

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त वाचनालयात ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. ध्वजारोहण सह कार्यवाह श्री. उदय काळे यांच्या हस्ते पार पडले या प्रसंगी उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, संचालक श्री.दिलीप पांढरे, अनिल लोखंडे, किरण आगरवाल, प्रा. ज्योती कुलकर्णी, गणेश अष्टेकर, राहूल तांबोळी, ग्रंथपाल संजय लिहिणे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## * मराठी राजभाषा दिन,बुधवार २७ फेब्रुवारी, २०१९ :

अहवाल वर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठीचे वैभवशाली साहित्याचे लेखक वि. वा. शिरवाडकर कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त मराठी राजभाषा दिन आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमा प्रसंगी जिल्हा नियोजन अधिकारी निलेश भदाणे हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. कुसमाग्रज यांचे जीवनावरील पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले अनेक कवि उपस्थित होते. तसेच याकार्यक्रम प्रसंगी वाचनालयाचे सह कार्यवाह उदय काळे यांनी पाहुण्याचा सत्कार केला. वाचनालयाची त्यांना माहिती सांगितली. संचालक किरण आगरवाल, गणेश अष्टेकर ग्रंथपाल संजय लिहिणे, वाचक सभासद व कर्मचारी वृंद यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

## * जागतिक महिला दिन, शुक्रवार ०८ मार्च, २०१९ :

अहमदनगर जिल्हा वाचनालय येथे महिला दिन साजरा करण्यात आला.या प्रसंगी संचालिका प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. तसेच अ.जि.वा.महिला कर्मचारी व सावेडी वाचनालयातील महिला कर्मचारी तसेच कर्तव्य दक्ष महिलांचा पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. वाचनालयाच्या उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांच्या हस्ते महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांनी केले. अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक वाचनालया बद्दल माहिती दिली. या प्रसंगी संचालक अनिल लोखंडे, किरण आगरवाल, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल संजय लिहिणे व कर्मचारी वृंद उपस्थित होते. अशा प्रकारे महिला दिन संपन्न झाला.

अहमदनगर जिल्हा वाचनालयात दाखल झालेल्या ग्रंथांचा तपशील

## सन २०१५ - २०१६ ते २०१८ - २०१९

| सन | मराठी | हिंदी | इंग्रजी | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०१५ - २०१६ | १,५०५ | - | २४५ | १,७५० |
| २०१६ - २०१७ | ९८० | | ३४० | १,३२० |
| २०१७ - २०१८ | १,२१३ | ३ | ५६ | १,२७२ |
| २०१८ - २०१९ | ९८२ | - | १९६ | १,१७८ |

| | | |
|---|---|---|
| वाचनालयातील सन २०१७-२०१८ अखेर ग्रंथ संख्या | - | १०,५१४० |
| वाचनालयातील सन २०१८-२०१९ मधील ग्रंथ खरेदी | - | १,१०८ |
| वाचनालयातील सन २०१८-२०१९ देणगी ग्रंथ संख्या | - | ७० |
| एकूण | - | १०,६३१८ |

## सन २०१८- २०१९ वर्षात वाचनालयात घेण्यात आलेली नियतकालिके

| अ.नं. | नियतकालिके | मराठी | हिंदी | इंग्रजी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | दैनिके | १७ | ०१ | ०४ | २२ |
| २. | साप्ताहिके | ५ | ०१ | ०४ | १० |
| ३. | पाक्षिके | ०१ | ०२ | ९ | १२ |
| ४. | मासिके | ३६ | ८ | १४ | ५८ |
| ५. | त्रैमासिके | - | - | - | - |
| ६. | वार्षिके | १५६ | - | - | १५६ |
| ७. | ब्रेल | ०२ | - | - | ०२ |
| | | | - | | |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय ( विश्वस्त संस्था )

सन २०१८-२०१९ मधील ग्रंथ देणगीदार

| अ.नं. | देणगीदारांचे नाव | मराठी | इंग्रजी | हिंदी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | राजाराम मोहन रॉय फौंडेशन | - | ४२ | - | ४२ |
| २. | मराठे सुमित्रा | ०२ | - | - | ०२ |
| ३. | भारतीय भाषा संस्थान उच्चतर शिक्षा | १५ | - | - | १५ |
| | विभाग,मानव संसाधन,विकास मंत्रालय | | - | - | |
| ४. | निसळ विजया | ०३ | - | - | ०३ |
| ५. | चंवडके मिलिंद | ०२ | - | - | ०२ |
| ६. | अ.नगर जिल्हा ग्रंथालय अधिकारी | ०१ | - | - | ०१ |
| | कार्यालय अ.नगर. | - | - | - | - |
| ७. | बर्डे संजीवनी रमाकांत | ५ | - | - | ५ |
| | एकूण | २८ | ४२ | | ७० |

## सर्व देणगीदारांचे वाचनालयातर्फे आभार !

---

### *वाचनालयात देणगी येणारे वाचन साहित्य*

१. प्रतोद, २.प्रिय रसिक ३. सुवार्ता, ४. सत्यप्रकाश, ५. कामगार जगत, ६.सा.सोधन, ७.संवाद, ८.महा.शासन राजपत्र, ९.सनातन चिंतन, १०.लोकमंथन, ११.आर्य जगत, १२.संस्था जगत, १३. चालू घडामोडी वार्ता, १४.वेद वार्ता, १५.नगर संकेत, १६.नोकरी वय. मार्गदर्शक, १७.थेऑसोफिस्ट, १८.सर्व्हिस फॉर कम्युनिकेटरर्स, १९.शब्द, २०.जागृती, २१.ज्ञानधारा, २२.ऋषीप्रसाद, २३.पुणे पोस्ट, २४.लोकमंथन, २५.वास्तूसंस्कृती, २६.रणधैर्य, २७.नवनीत (हिंदी), २८.हंस (हिंदी) २९.वागर्थ, ३०.नया ज्ञानोद्य, ३१.नगर वेध, ३२.रायगडचा युवक, ३३.नवी आशा दिशा, ३४ सूर्यधर्म, ३५ संत नगर टाईम्स,३६.सेल्फ डेव्हलपमेंट.३७.नवशक्ती,३८.फ्री जनरल प्रेस

सर्व देणगीदारांचे वाचनालयातर्फे आभार !

## अहमदनगर जिल्हा वाचनालयसन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक

### जमा

| नं | खात्याचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वर्गणी व प्रवेश फी | ७,५०,०००=०० |
| २. | नुकसान भरपाई | ४,०००=०० |
| ३. | ज्यादा/इतर फी | ७,०००=०० |
| ४. | अनुदान महाराष्ट्र सरकार | ७,२०,०००=०० |
| ५. | साधन सामुग्री अनुदान | ३५,०००=०० |
| ६. | देणगी रोख व पुस्तकरूपाने | १,५०,०००=०० |
| ७. | रद्दी विक्री | १५,०००=०० |
| ८. | तुट | २,५००=०० |
| | एकूण रक्कम रु. | १६,८३,५००=०० |

### खर्च

| नं | खात्याचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | टेलिफोन खर्च | २०,०००=०० |
| २. | इन्कमटॅक्स खर्च | १,००,०००=०० |
| ३. | सेवकवर्ग पगार | ८,५०,०००=०० |
| ४. | टपाल वर्ग | १,०००=०० |
| ५. | वीज/दिवाबत्ती खर्च | ४०,०००=०० |
| ६. | प्रवास खर्च | १५,०००=०० |
| ७. | वृत्तपत्र मासिक, साप्ताहिक | १,४०,०००=०० |
| ८. | ग्रंथ खरेदी | २,००,०००=०० |
| ९. | सांस्कृतिक कार्यक्रम | ८५,०००=०० |
| १०. | वाहतूक खर्च | १,०००=०० |
| ११. | छपाई खर्च | २५,०००=०० |
| १२. | पुस्तक बांधणी | ७,०००=०० |
| १३. | स्टेशनरी खर्च | १०,०००=०० |
| १४. | डेडस्टॉक खरेदी | ४०,०००=०० |
| १५. | स्वच्छता व सफाई | २२,५००=०० |
| १६. | टायपिंग व झेरॉक्स | १,०००=०० |
| १७. | प्रा.फंड कॉन्ट्रीब्युशन | १५,०००=०० |
| १८. | विमा | ७,५००=०० |
| १९. | ऑडीट फी | ८,०००=०० |
| २०. | डिपॉझिट रिझर्व फंड | २५,०००=०० |
| २१. | विश्वस्त संस्थेला अदा | २०,०००=०० |
| २२. | बांधकाम फंड | २०,०००=०० |
| २३. | संगणक खर्च | २,५००=०० |
| २४. | डाटा एन्ट्री चार्जेस | ६,०००=०० |
| २५. | सॉफ्टवेअर खर्च | २२,०००=०० |
| | एकूण रक्कम रु | १६,८३,५००=०० |

## अहमदनगर जिल्हा वाचनालय, (विश्वस्त संस्थेचे)सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक

### जमा

| नं. | खात्याचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | देणगी | २,७०,०००=०० |
| २. | जागा भाडे | ४,०००=०० |
| ३. | आजीव सभासद | ५,०००=०० |
| ४. | वाचनालयाकडून जमा | २०,०००=०० |
| ५) | जाहिराती पोटी जमा | ५८,०००=०० |
| | एकूण रक्कम रु. | ३,५७,०००=०० |

### खर्च

| नं. | खात्याचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | मिटिंग खर्च | १०,०००=०० |
| २. | इमारत दुरुस्ती व देखभाल | २५,०००=०० |
| ३. | इमारत बांधकाम | ५०,०००=०० |
| ४. | स्टेशनरी खर्च | ५,०००=०० |
| ५. | छपाई खर्च | ५,०००=०० |
| ६. | लिगल खर्च | १०,०००=०० |
| ७. | किरकोळ खर्च | ५,०००=०० |
| ८. | जनसंपर्क व शिष्टाचार | ५,०००=०० |
| ९. | ऑफिस खर्च | ३५,०००=०० |
| १०. | प्रासंगिक खर्च | ९,०००=०० |
| ११. | कार्यक्रम खर्च | ४०,०००=०० |
| १२. | सावेडी वाचनालय | १,५०,०००=०० |
| १३. | टपाल खर्च | ५,०००=०० |
| १४. | ट्रस्ट फंड | २,५००=०० |
| १५ | टायपिंग वझेरॉक्स खर्च | ५००=०० |
| | एकूण रक्कम रु. | ३,५७,०००=०० |

## अहमदनगर जिल्हा वाचनालय विश्वस्त संस्था, अहमदनगर

### जमा व खर्च पत्रक दि. ०१/०४/ २०१८ ते ३१/०३/ २०१९ अखेरचे

| जमा | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | |
| रोख | ३०,४८६.०० | |
| शहर सह. बँक बचत ठेव २९६८ | २,१८,७४९.०० | |
| शहर बँक मुदत ठेव खाते | २६,४६,७६०.०० | २८,९५,९९५.०० |
| देणगी | | २,६६,३००.०० |
| जाहिरात | | ५६,२५०.०० |
| जागा भाडे | | ३,२४०.०० |
| बँक व्याज | | २,७७,२२५.०० |
| उसनवार वाचनालय | | २०,०००.०० |
| एकूण रक्कम रुपये | | ३५,१९,०१०.०० |

| खर्च | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|
| किरकोळ खर्च | | ४,४२०.०० |
| मिटिंग खर्च | | २,६००.०० |
| कार्यालयीन सादिलवार | | २८,४३४.०० |
| बँक कमिशन | | २,५०.०० |
| सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | | ३६,४४७.०० |
| पाहूणचार व जनसंपर्क | | ५,२०.०० |
| कोर्ट खर्च | | ६,०००.०० |
| स्टेशनरी | | ३,१९७.०० |
| टपाल खर्च | | ३,१६१.०० |
| इमारत दुरुस्ती | | ३,७०.०० |
| टायपिंग व झेरॉक्स | | ५०.०० |
| उसनवार सावेडी वाचनालय | | १,३९,९००.०० |
| अखेरची शिल्लक | | |
| रोख | १२,६७९.०० | |
| शहर सह. बँक बचत ठेव २९६८ | १,५६,९९७.०० | |
| शहर बँक मुदत ठेव खाते | ३१,२३,९८५.०० | ३२,९३,६६१.०० |
| एकूण रक्कम रुपये | | ३५,१९,०१०.०० |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर

## जमा व खर्च पत्रक दि. ०१/०४/ २०१८ ते ३१/०३/ २०१९ अखेरचे

| जमा | रक्कम रुपये | रक्कम रुपये | खर्च | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | | | डिपॉझिट परत | | ४३,७०५.०० |
| आरंभीची शिल्लक | | | अ‍ॅडव्हांस | | ६०,०००.०० |
| रोख | १८,४२०.२५ | | टेलिफोन खर्च | | १७,५८९.०० |
| मर्चंट बँक बचत खाते १७२२ | ८७,८८२.५० | | सेवक वर्ग पगार | | ८,३९,०६२.०० |
| मर्चंट बँक प्रोव्हिंड फंड से. खाते | २९,७१४.७४ | | टपाल खर्च | | ४६०.०० |
| मुदत ठेवी प्रोव्हिंड फंड | ४,२७,०७४.०० | | वीज खर्च | | ३२,८२०.०० |
| मुदत ठेवी वाचनालय | २४,७५,९१२.०० | | प्रवास खर्च | | १२,३६७.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया से. खाते | १,६९,७३२.०० | ३२,०८,७३५.४९ | छपाई खर्च | | २३,७६३.०० |
| | | | वृत्तपत्र व मासिके साप्ताहिके इ. | | १,४४,०२८.०० |
| <u>देणगी</u> | | | | | |
| रोख | ——— | | <u>ग्रंथ खरेदी</u> | | |
| पुस्तक रूपाने | २५,३४९.०० | २५,३४९.०० | रोख | १,८२,०८२.०० | |
| | | | देणगी रूपाने | २५,३४९.०० | २,०७,४३१.०० |
| <u>अनुदान</u> | | | | | |
| महाराष्ट्र सरकार | | ९,०५,७५३.०० | स्टेशनरी | | ७,१८०.०० |
| | | | डेडस्टॉक दुरुस्ती | | ३,०५०.०० |
| <u>रीसिटस</u> | | | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | | ८४,०००.०० |
| वर्गणी | ६,५३,३४५.०० | | प्रो.फंड वर्गणी | | १४,१७०.०० |
| प्रवेश फी | ८,०५०.०० | | विमा | | ६,९३५.०० |
| स्पर्धा प्रवेश फी | ९,७१०.०० | | बँक कमिशन | | १४८.९० |
| नुकसान भरपाई | २,४२०.०० | ६,७३,५२५.०० | स्वच्छता व सफाई | | ७,४३०.०० |
| | | | सॉफटवेअर खर्च | | २०,२६५.०० |
| रद्दी विक्री | | १३,१४३.०० | पुस्तक बांधणी | | ६,१६०.०० |
| डिपोझिट | | ७३,५४५.०० | ऑडिट फी | | ६,०००.०० |
| इतर जमा | | ५,९६५.०० | प्रा.फंड परत | | ६५,७००.०० |
| बँक व्याज | | २,२९,३४४.०० | संगणक खर्च | | १,३९०.०० |
| अ‍ॅडव्हॉस सेवक वर्ग | | ६९,६००.०० | डेडस्टॉक खरेदी | | ३४,७७०.०० |
| प्रा.फंड सेवक वर्ग | | ७३,७५८.०० | आयकर खर्च | | ९०,८५०.०० |
| राज्य मराठी विकास संस्था | | १०,०००.०० | | | |
| | | | <u>अखेरची शिल्लक</u> | | |
| | | | रोख | ५,०६९.२५ | |
| | | | मर्चंट बँक बचत खाते १७२२ | १,७४,५५२.१० | |
| | | | मर्चंट बँक प्रॉव्हिडंड फंड से.खाते | ४०,४७९.७४ | |
| | | | मुदत ठेवी प्रॉव्हिडंड फंड | ४,२४,३६७.०० | |
| | | | मुदत ठेवी वाचनालय | २४,९३,००३.०० | |
| | | | स्टेट बँक ऑफ इंडिया से. खाते | ४,२१,९७२.५० | ३५,५९,४४३.५९ |
| एकूण रक्कम रुपये | | ५२,८८,७१७.४९ | एकूण रक्कम रुपये | | ५२,८८,७१७.४९ |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय सावेडी, अहमदनगर

## जमा व खर्च पत्रक दि. ०१/०४/ २०१८ ते ३१/०३/ २०१९ अखेरचे

| जमा | रक्कम रुपये | रक्कम रुपये | खर्च | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | | | डिपॉझिट परत | | ३५,८००.०० |
| <u>आरंभीची शिल्लक</u> | | | जागा भाडे | | १,३०,४८०.०० |
| रोख | २८,१६३.०० | | ग्रंथ खरेदी ( रोख) | | १८,३७१.५० |
| शहर सहकारी बँक | ९,९८६.०० | ३८,१४९.०० | कार्यक्रम खर्च | | ९२०.०० |
| | | | स्टेशनरी खर्च | | ३,१७१.०० |
| वर्गणी | | १,८४,६२०.०० | वीज खर्च | | ५,८३८.०० |
| प्रवेश फी | | ३,६६५.०० | किरकोळ खर्च | | २,६३१.०० |
| डिपॉझीट | | २४,५००.०० | ऑफिस खर्च | | ५,०९१.०० |
| विश्वस्त संस्थेकडून जमा | | १,१९,९००.०० | बँक चार्जेस | | ३७०.०० |
| | | | झेरॉक्स खर्च | | ५८३.०० |
| | | | सेवकवर्ग वेतन | | १,१९,४००.०० |
| | | | पुस्तक बांधणी खर्च | | २,६००.०० |
| | | | साफसफाई खर्च | | ६,१००.०० |
| | | | दिवाळी बोनस | | २,४००.०० |
| | | | जागा डिपॉझिट | | २०,०००.०० |
| | | | डेड स्टोक रिपेअर | | १५०.०० |
| | | | प्रवासखर्च | | ८४०.०० |
| | | | <u>अखेरची शिल्लक</u> | | |
| | | | रोख | ६,२८९.०० | |
| | | | शहर सहकारी बँक | ९,७९९.५० | १,६०,०८८.५० |
| एकूण रक्कम रुपये | | ३,७०,८३४.०० | एकूण रक्कम रुपये | | ३,७०,८३४.०० |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |

## अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर

### एकत्रित उत्पन्न व खर्च पत्रक दि. ०१/०४/ २०१८ ते ३१/०३/ २०१९ अखेरचे

| खर्च | एकूण | उत्पन्न | एकूण |
|---|---|---|---|
| <u>ट्रस्टच्या उद्दिष्टयावरील खर्च</u> | | <u>देणगी</u> | |
| टेलिफोन खर्च | २७६४७.०० | रोख | २,७८,५००.०० |
| किरकोळ खर्च | ५,७८१.०० | पुस्तक रूपाने | १,२९,७५८.०० |
| सेवक वर्ग पगार | ८,५१,२३२.०० | जागा भाडे | ४,४४०.०० |
| टपाल खर्च | २,९२१.०० | | |
| वीज खर्च | ३७,८७५.०० | अनुदान | |
| प्रवास खर्च | ६,२५६.०० | महाराष्ट्र सरकार | ८,४५,१७२.०० |
| छपाई खर्च | ५३,८०३.०० | | |
| वृत्तपत्र व मासिके साप्ताहिके इ. | १,७३,११४.०० | <u>रिसिट्स</u> | |
| डाटा एन्ट्री चार्जेस | ५०५.०० | वर्गणी | १०,४३,७६५.०० |
| स्टेशनरी | १३,९९१.०० | प्रवेश फी | १०,८८५.०० |
| डेड्स्टॉक दुरुस्ती | १०,८४०.०० | ज्यादा फी | ५६५.०० |
| व्यक्तिमत्व विकास शिबीर खर्च | २,१८९.०० | स्पर्धा प्रवेश फी | ५,५३०.०० |
| सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | ९७५०९.०० | व्यक्तिमत्व विकास शिबीर फी | ३,८००.०० |
| विमा | ६,६१८.०० | नुकसान भरपाई | १,४७५.०० |
| प्रा.फंड वर्गणी | १२,३६६.०० | रद्दी विक्री | १०,९९९.०० |
| स्वच्छता व सफाई | ६,१२५.०० | इतर जमा | २,३३०.०० |
| पुस्तक बांधणी | १६,४७४.०० | बँक व्याज | ३,६३,२४४.०० |
| ऑडीट फी | २,५००.०० | जाहिरातीचे जमा | ५४,०००.०० |
| संगणक खर्च | ९९०.०० | | |
| बँक कमिशन | ६९०.०० | | |
| कार्यालयीन सादिलवार | ३०,४०६.०० | | |
| मिटिंग खर्च | १०,५२९.०० | | |
| कोर्ट खर्च | ८,२४५.०० | | |
| पाहुणचार व जनसंपर्क | ६,८७६.०० | | |
| जागा भाडे | १,३५,२००.०० | | |
| झेरॉक्स | ८८.०० | | |
| दिवाळी बोनस | ३,०००.०० | | |
| गणेशोत्सव खर्च | ६६१.०० | | |
| संघटन खर्च | ५५०.०० | | |
| <u>घसारा</u> | | | |
| ग्रंथ | ३,६१,९७४.०० | | |
| संगणक | १७,४१४.०० | | |
| फर्निचर व डेड्स्टॉक | १,०१,३८०.०० | | |
| इमारत | ७५,१२४.०० | | |
| वाहतूक खर्च | ४०.०० | | |
| राखीव निधीकडे वर्ग | ६,५०,०००.०० | | |
| चालू वर्षातील नफा ताळेबंदास वर्ग | २३,५५०.०० | | |
| एकूण रक्कम | २७,५४,४६३,०० | एकूण रक्कम | २७,५४,४६३,०० |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर

## एकत्रित ताळेबंद पत्रक दि.०१ / ०४ / २०१८ ते ३१ /०३ / २०१९ अखेरचे

| भांडवल | रक्कम रुपये | रक्कम रुपये | जिंदगी | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| <u>ट्रस्ट फंड</u> | | | <u>इमारत</u> | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ३,६३,६०८.७० | | मूळ किमंत | १४,४४,८८१.६० | |
| पुस्तक फंड | ३५,०००.०० | | अधिक नविन बांधकाम | | |
| इक्विपमेंट फंड | ६,८१९.०० | | | १४,४४,८८१.६० | |
| अनुदान इमारतीसाठि | ३७,५००.०० | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | ६९३६४४.६० | |
| अजीव सभासद फी | ८२,२५५.०० | ५,२५,१८२.७० | वजा घसारा चालू वर्षातील १०% | (७५,१२४.००) | ६,७६,११३.०० |
| रिझर्व्ह फंड | ७,२२,२९२.२० | | <u>ग्रंथ</u> | | |
| इमारत निधी | ७०,०००.०० | ७,९२,२९२.२० | मूळ किमंत | ५४,९०,५०५.९० | |
| | | | अधिक नविन | ३,३६,७२९.०० | |
| <u>इतर देणे</u> | | | | ५८,२७,२३४.९० | |
| भविष्य निर्वाह निधी | ३,९४,९४९.७४ | | | | |
| वाचनालय डिपोझिट | ९,४१,९३६.०० | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | (३४,१४,०७४.१४) | |
| ऑडिट फी देणे | २,०००.०० | १३,३८,८८५.७४ | वजा घसारा चालू वर्षातील १५ टक्के | (३,६१,९७४.००) | २०,५१,१८६.७६ |
| सेवक वर्ग ॲडव्हांस | | ६,३३०.०० | <u>लोकमान्य टिळक पुतळा</u> | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ३,७१४.४५ |
| उत्पन्न व खर्च खाते | | | | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ७१,५३,६९०.३६ | | <u>संगणक</u> | | |
| अधिक चालू वर्षातील नफा | २३,५५०.०० | ७१,७७,२४०.३६ | मूळ किमंत | १,८१,२५५.०० | |
| | | | अधिक नविन | २७,९८०.०० | |
| | | | | २,०९,२३५.०० | |
| | | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | (१,३९,५७८.००) | |
| | | | वजा घसारा चालू वर्षातील २५% | (१७,४१४.००) | ५२,२४३.०० |
| | | | <u>फर्निचर व डेडस्टॉक</u> | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | १६,२१,१६९.५० | |
| | | | अधिक नविन | ९०,९६०.०० | |
| | | | | १७,१२,१२९.५० | |
| | | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | (६,९८,३२७.२०) | |
| | | | वजा घसारा चालू वर्षातील १०% | (१,०१,३८०.००) | ९,१२,४२२.३० |
| | | | <u>ॲडव्हान्स</u> | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ३,६७,९३०.०० |
| | | | <u>इतर येणे</u> | | |
| | | | महाराष्ट्र राज्य विज मंडळ | ४,०६५.०० | |
| | | | गॅस डिपॉझिट | १,४००.०० | ५,४६५.०० |
| | | | <u>अखेरची शिल्लक</u> | | |
| | | | रोख वाचनालय | ११,६३५.२५ | |
| | | | रोख संस्था | १२,०६४.०० | |
| | | | रोख सावेडी | १५,६४२.०० | |
| | | | मर्चंट बँक बचत खाते १७२२ | ३,९०,१८७.५० | |
| | | | मर्चंट बँक प्रॉव्हिडंड फंड से. खाते | २,७५०.७४ | |
| | | | मुदत ठेवी प्रॉव्हिंडड फंड | ३९२१९९.०० | |
| | | | मुदत ठेवी वाचनालय | २३,५५,८५५.०० | |
| | | | स्टेट बँक ऑफ इंडिया से. खाते | ९,२२,२८०.०० | |
| | | | शहर सह. बँक से. ठेव खाते २९६८ | २,२१,७५४.०० | |
| | | | शहर सह. बँक मुदत ठेव खाते | १३,२०,९९४.०० | |
| | | | शहर सहकारी बँक सावेडी | ४९,३७३.०० | |
| | | | मुदत ठेवी सावेडी | ७६,१२२.०० | ५७,७०,८९६.४९ |
| **एकूण रक्कम** | | **९८,३९,९३१.००** | **एकूण रक्कम** | | **९८,३९,९३१.००** |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |